# प्रेस रिलीज नोट

## आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये भारताने सागरी उत्पादनांच्या निर्यातीमध्ये USD 7.76 बिलियन पर्यंत सर्वाधिक उच्चांक गाठला आहे

## गोठवलेली कोळंबी (फ्रोझन श्रिम्प) हा सर्वाधिक निर्यात होणारा प्रकार राहीला आहे

## यूएसए, चीन, ईयू, दक्षिण पूर्व आशिया, जपान आणि मध्य पूर्व हे प्रमुख आयातदार आहेत

कोची, 29 जून: भारताने प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा 2021-22 मध्ये 57,586.48 कोटी रुपये मूल्याची 13,69,264 मेट्रिक टन सीफूड ची निर्यात केली .

गोठवलेली कोळंबी हे परिमाण आणि मूल्य या दोन्ही बाबतीत प्रमुख निर्यात प्रकार राहिले, तर यूएसए आणि चीन हे भारताच्या सीफूडचे प्रमुख आयातदार आहेत .

आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये , सीफूडच्या निर्यातीत रुपयाच्या प्रमाणात 31.71%, USD मध्ये 30.26% आणि परिमाणाच्या दृष्टीने 19.12% ने सुधारणा झाली. 2020-21 मध्ये , भारताने 43,720.98 कोटी रुपये (USD 5,956.93 दशलक्ष) किमतीचे 11,49,510 मेट्रिक टन सीफूड निर्यात केले होते.

सागरी उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाचे (एमपीईडीए) अध्यक्ष , श्री के एन राघवन - आयआरएस , म्हणाले की, कोविड महामारीमुळे आपल्या प्रमुख निर्यात बाजारपेठेतील अनेक आव्हाने असतानाही , भारताने 13,69,264 मेट्रिक टन समुद्री खाद्यपदार्थांची 7.76 अब्ज डॉलर्स इतकी सर्वकालीन उच्चांकी निर्यात करण्यात यश मिळवले आहे. भारत सरकारच्या वाणिज्य विभागाने दिलेले निर्यात लक्ष्य देखील 99.4 0% ने पूर्ण केले आहे.

गोठवलेली कोळंबी, ह्या प्रकाराने 42,706.04 कोटी रुपये ( USD 5,828.59 दशलक्ष) कमावून सीफूड निर्यातीच्या बास्केटमधील सर्वात महत्त्वपूर्ण प्रकार म्हणून त्याचे स्थान कायम ठेवले आहे . कोळंबीचा वाटा एकूण निर्यातिच्या डॉलर आणि परिमाणाच्या अनुक्रमे 53.18 टक्के आणि 75.11 टक्के आहे. या कालावधीत कोळंबीच्या निर्यातीत USD मूल्यात 31.68 टक्के आणि परिमाणात 23.35 टक्के वाढ झाली आहे.

2021-22 मध्ये गोठवलेल्या कोळंबीची एकूण निर्यात 7 ,28,123 मेट्रिक टन ( MT) इतकी होती , ज्यातून USD 5,828.59 दशलक्ष डॉलर्सचे परकीय चलन मिळाले. गोठवलेल्या कोळंबीची (3 ,42,572 MT) आयात

करणारी सर्वात मोठी बाजारपेठ यूएसए असून, त्यानंतर चीन (1,25,667 MT), युरोपियन युनियन (90,549 MT), दक्षिण पूर्व आशिया (44,683 MT), जपान (38,492 MT), आणि मध्य पूर्व (37,158 MT) या देशांचा क्रमांक लागतो. गोठवलेल्या कोळंबीच्या निर्यातीने सर्व बाजारपेठेत मूल्यानुसार वाढ दर्शवली आहे.

व्हन्नामी ( व्हाइट लेग ) कोळंबीची निर्यात 2021-22 मध्ये 5,15,907 MT वरून 6,43,037 MT पर्यंत वाढली आहे. USD मूल्याच्या दृष्टीने एकूण व्हन्नामी कोळंबीच्या निर्यातीपैकी यूएसएचा वाटा 59.05% आहे , त्यानंतर चीन (14.59%), युरोपियन युनियन (8.16 %), दक्षिण पूर्व आशिया (4.78 %) , जपान (3.61%), आणि मध्य पूर्व (3.17 %) या देशांचा क्रमांक लागतो . USD मूल्याच्या बाबतीत 25.90% वाटा असले ल्या ब्लॅक टायगर कोळंबीसाठी यूएसए ही प्रमुख बाजारपेठ बनली असून, त्यानंतर युरोपियन युनियन (23.78%) आणि जपान (22.71%) आहेत.

इतर मत्स्य उत्पादने निर्यातीमध्ये दुसरया क्रमांकावर असून त्याचे निर्यातमूल्य रु.3,979.99 कोटी ( USD 540.73 दशलक्ष) आहे. ज्याचे परिमाण 12.96% आणि डॉलर कमाई 6.97% आहे. इतर मत्स्य उत्पादनांमध्ये निर्यातीत रुपयाच्या मूल्यात 43.80 टक्के आणि डॉलरच्या मूल्यात 42.94 टक्के वाढ झाली आहे. इतर उत्पादनांमध्ये सुरीमी आणि सुरीमी ॲनालॉग उत्पादनांचा USD मूल्यानूसार 56.55% इतका वाटा आहे.

सर्वात जास्त निर्यात झालेल्या उत्पादनांमध्ये गोठवलेले मासे (फ्रोझन फिश), या प्रकाराने रु. 3471.91 कोटी (USD 471.45 दशलक्ष) सह तृतीय स्थान पटकावले असून ज्याचे परिमाण 16.55 टक्के आणि डॉलर कमाई 6.08 टक्के आहे. गोठवलेल्या माशांच्या निर्याती च्या प्रमाणात 20.44% आणि डॉलर मूल्यात 17.19% वाढ झाली आहे.

गोठवलेल्या स्क्विड (फ्रोझन स्क्विड) ची निर्यात, 75,750 MT एवढी आहे, एकूण परिमाणात 23.82% आणि डॉलरच्या बाबतीत 40.24% ची वाढ दर्शविली आणि रु. 2 ,806.09 कोटी (383.37 USD दशलक्ष) कमावले.

गोठवलेल्या कटलफिश (फ्रोझन कटलफिश ) ची निर्यात, 58,992 मेट्रिक टन इतकी आहे, रुपये मूल्यात 26.83 % आणि USD मूल्यात 26.18 % वाढ दर्शविली आणि 2062.63 कोटी रुपये (280.08 USD दशलक्ष) कमावले.

73,679 मेट्रिक टन सुकवलेल्या (ड्राइड )माशांच्या निर्यातीत रुपयाच्या मूल्यात 28.27% ची वाढ दर्शविली परंतु USD मूल्यात 8.59% घट झाली आणि रु.1472.98 कोटी (143.46 USD दशलक्ष) कमावले.

आश्वासक क्षेत्र मानल्या जाणाऱ्या फ्रेश-चील्ड माशांच्या निर्यातीतही परिमाणाच्या दृष्टीने 23.08% आणि रुपयाच्या दृष्टीने 53.45% ने वाढ झाली, परंतु USD मध्ये 1.87 टक्क्यांनी घसरण झाली.

जीवंत माशांच्या निर्यातीत, 7,032 MT, परिमाणात 60.57%, रुपये मूल्यात 47.43% आणि USD मध्ये 46.67% एवढी वाढ दर्शविली गेली आहे .

गोठवलेली कोळंबी, गोठवलेले कटलफिश, गोठवलेले स्क्विड, सुकविलेले मत्स्य प्रकार आणि इतर मत्स्योत्पादनांमध्ये युनिट मूल्य प्राप्तीमध्ये सकारात्मक वाढ दिसून आली आहे.

परदेशातील बाजारपेठांसाठी , USD 3371.66 दशलक्ष किमतीच्या आयातीसह मूल्य आणि परिमाण टर्म दोन्हीमध्ये यूएसए भारतीय सीफूडचे प्रमुख आयातदार राहिले ,ज्याचा डॉलर मूल्याच्या संदर्भात 37.56 % इतका वाटा राहिला. यूएस मधील निर्यात परिमाणात 27.63% , रुपयाच्या मूल्यात 36.76% आणि USD कमाईत 37.56% वाढ नोंदवली गेली. फ्रोझन कोळंबी हा यूएसला निर्यात होणारा प्रमुख प्रकार आहे आणि व्हन्नामी कोळंबीच्या निर्यातीत परिमाणात 26.81% आणि डॉलरच्या मूल्यात 34.65% वाढ झाली. अमेरिकेला ब्लॅक टायगर कोळंबीची निर्यात परिमाणाच्यानुसार 68.99% आणि USD नुसार 152.06% वाढली.

USD 1,175.05 दशलक्ष किमतीच्या 2,66,989 MTच्या आयातीसह परिमाणानुसार भारतातून निर्यात होणाऱ्या समुद्री खाद्य प्रकारा मध्ये चीन दुसऱ्या क्रमांकाचे निर्यात गंतव्यस्थान म्हणून उदयास आले , ज्याचे प्रमाण 19.50% आणि डॉलरच्या दृष्टीने 15.14% आहे. चीनच्या बाजारपेठेतील निर्यात परिमाणात 22.28% आणि रूप ये मूल्यात 31.09% आणि USD मूल्यात 25.12% इतकी वाढ झाली . फ्रोझन कोळंबी , चीनला निर्यात होणा रा प्रमुख प्रकार आहे त्यात , 47.07% परिमाणात आणि डॉलरच्या मूल्यात 67.04% , तर गोठवलेल्या माशांचा वाटा परिमाणात 32.10% आणि मूल्याच्या बाबतीत 15.19% होता. भारतातून चीनला निर्यात झालेल्या गोठवलेल्या कोळंबीमध्ये परिमाण आणि आकारमानात सकारात्मक वाढ दिसून आली आहे.

गोठवलेल्या कोळंबीसह भारतीय सीफूडसाठी युरोपियन युनियन हे तिसरे सर्वात मोठे गंतव्यस्थान बनले आहे , परिमाणात आणि डॉलरच्या मूल्यात अनुक्रमे 29.11% आणि 37.09% वाढ नोंदवली आहे.

दक्षिण पूर्व आशिया ही चौथी मोठी बाजारपेठ आहे. 22.29% वाढीसह गोठवलेली कोळंबी, निर्यातीतील प्रमुख प्रकार आहे, परिमाणात 18.36% आणि USD मूल्यानुसार त्याची किंमत 36.81% इतकी आहे . गोठवलेले मासे 82.24% वाढीसह 33.42% परिमाण आणि USD मूल्यानुसार 21.42% वाटा असले ला, निर्यातीचा दुसरा प्रमुख प्रकार आहे .

USD मूल्याच्या दृष्टीने 5.68% आणि परिमाणात 6.60% सह जपान पाचव्या क्रमांकाचा आयातदार बनला , USD मूल्यामध्ये 6.95% ची वाढ नोंदवली गेली. तसेच गोठवलेली कोळंबी त्यामध्ये 74.55% आहे आणि USD मूल्यात 3.73% वाढीसह गोठवलेली कोळंबी जपानला निर्यात झालेला प्रमुख प्रकार आहे .

मध्यपूर्वेतील निर्यातीतही परिमाणात 20.2 0%, रुपयात 21.27% आणि डॉलरच्या बाबतीत 20.7 0% वाढ झाली आहे.

-----समाप्त -----